**क्रमांक : प्र/आस्था-२/ड्रम युनिट/ २०२५/८८७**　　　　**दिनांक : १९ मार्च, २०२५**

**विषय :कोनिका मिनोल्टा बिझहब C२५०i झेरॉक्स यंत्राकरीता ड्रम युनिट खरेदीबाबत.**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या नगर व क्षेत्र नियोजन विभागातील कोनिका मिनोल्टा बिझहब C२५०i झेरॉक्स यंत्रामध्ये खालील तक्त्यात नमूद ड्रम युनिटची आवश्यकता असून, त्याकरीता कोनिका मिनोल्टा बिझहबच्या प्राधिकृत सेवापुरवठादारांकडून दरपत्रक मागवित आहे. इच्छुक स्थानिक प्राधिकृत सेवापुरवठादाराने त्यांची दरपत्रके दिनांक २७ मार्च, २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सचिव, कार्यकारी समिती, प्रशासन विभाग येथे सादर करावीत. सदर मुदतीनंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

२.　प्राधिकृत सेवापुरवठादाराने दरपत्रक कंपनीच्या लेटर हेडवर तसेच दरपत्रकासोबत मालकाचे नाव व कंपनीचे पॅनकार्ड, जीएसटी प्रमाणपत्र व अधिकृत विक्रेता प्रमाणपत्र सादर करावेत.

**<u>दरपत्रकाचा नमुना</u>**

| अ. क्र. | मॉडेल क्र. | झेरॉक्स यंत्राच्या पार्टसचे नाव | नग | रक्कम (रू) | वस्तु व सेवा कर |
|---|---|---|---|---|---|
| १ | Bizhub C२५०i | DRUM UNIT – BLACK | ०१ | | |
| २ | Bizhub C२५०i | DRUM UNIT – CYAN | ०१ | | |
| ३ | Bizhub C२५०i | DRUM UNIT – MAGENTA | ०१ | | |
| ४ | Bizhub C२५०i | DRUM UNIT – YELLOW | ०१ | | |

२.　उपरोक्त विषयासंबंधीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत :-

१) प्राधिकृत सेवापुरवठादारास यापूर्वी अशा खरेदी संबंधीच्या सेवा पुरविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२) सदर दर नमूद करताना कोणताही अतिरिक्त दर अंतर्भूत नसावा.

३) देयक सादर केल्याच्या दिनांकापासून देयकाची रक्कम सुमारे ३० दिवसात ई-पेमेंटद्वारे अदा करण्यात येईल.

४) तसेच, सदर ड्रमयुनिट्समध्ये कोणताही दोष आढळल्यास, दर्जानुसार नसल्यास, तसेच उशिरा मिळाल्यास ड्रमयुनिट्स परत करण्यात येईल व सक्षम प्राधिकारी ठरवेल त्यानुसार दंड आकारण्यात येईल.

..२/-

५) तसेच कार्यालयात उपरोक्त झेरॉक्स यंत्राचं ड्रम युनिट घेऊन येणाऱ्या व्यक्तीस कोणताही अतिरिक्त खर्च अदा केला जाणार नाही.

६) आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे कार्यादेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्राधिकरणास लेखी पत्र सादर करावे.

७) हे प्राधिकरण कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही निविदा / दरपत्रक फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहे.

19/3/2025

**सचिव,**
**कार्यकारी समिती (अ.का.)**